RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ७०

दि. ०५ जुलै २०२६, वार : रविवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## अमित देशमुख यांनी घ्यायला हवा होता पुढाकार; लातूरच्या विभागीय आयुक्तालयाचा मुद्दा अधिवेशनात अभिमन्यू पवार यांनी गाजवला




**लातूर/प्रतिनिधी:** लातूरला विभागीय आयुक्तालय कार्यान्वित करण्याच्या दीर्घकालीन मागणीचा मुद्दा राज्याच्या पावसाळी अधिवेशनात औसा मतदारसंघाचे भाजप आमदार अभिमन्यू पवार यांनी लक्षवेधीद्वारे उपस्थित केला. मात्र हा विषय लातूर शहरचे आमदार, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद अमित विलासराव देशमुख यांनी स्वतः पुढाकार घेऊन शासनासमोर मांडणे अपेक्षित होते, अशी चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी ''जे जे नवे ते लातूरला हवे'' या विकासदृष्टीकोनातून लातूरच्या सर्वांगीण विकासासाठी मोठे योगदान दिले. विविध मंत्रीपदांवर कार्यरत असताना त्यांनी अनेक विभागीय कार्यालये लातूरमध्ये आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यामुळे आज लातूरमध्ये २५ पेक्षा अधिक विभागीय कार्यालये कार्यरत आहेत.

भविष्यात विभागीय आयुक्तालय सुरू होईल, या उद्देशाने नवीन जिल्हाधिकारी कार्यालयाची इमारतही उभारण्यात आली होती. अशा पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्तालयासारखा महत्त्वाचा विषय अधिवेशनात सत्ताधारी पक्षाच्या आमदारांनी मांडल्याने राजकीय चर्चेला उधाण आले आहे. लातूरचे प्रतिनिधित्व करणारे आणि राज्यात मंत्रीपदाची जबाबदारी सांभाळलेले अमित विलासराव देशमुख यांनी या विषयात अधिक सक्रिय भूमिका घेणे अपेक्षित होते, अशी प्रतिक्रिया विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

लातूरला विभागीय आयुक्तालयाचा दर्जा मिळणे ही जिल्ह्याच्या प्रशासकीय आणि विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची बाब मानली जाते. त्यामुळे या मागणीबाबत आता शासनाची भूमिका आणि आमदार अमित विलासराव देशमुख यांची पुढील भूमिका काय असेल, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.



## एकरकमी कर भरणाऱ्यांना व्याजात सवलत, मनपाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**लातूर/प्रतिनिधी:** दिनांक ६ ते २० जुलै या कालावधीत थकीत कर एकरकमी भरणाऱ्या नागरिकांना व्याज शास्तीमध्ये १०० टक्के सवलत देण्याचा निर्णय लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने घेण्यात आला आहे.

शहरातील नागरिकांनी आपल्याकडील थकीत कराचा भरणा करावा यासाठी महानगरपालिकेच्या वतीने वेळोवेळी आवाहन करण्यात येत आहे. अनेक नागरिकांकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी शिल्लक आहे. नागरिकांनी व्याजात सुट देण्याची मागणी सुधा केली होती. नागरिकांची मागणी व कर वसुलीस चालना देणे साठी थकीत करावरील व्याजामध्ये सवलत देण्याचे निर्देश महापौर जयश्रीताई सोनकांबळे, उपमहापौर स्नेहल उटगे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, सभागृह नेते विजयकुमार साबदे, विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनी प्रशासनाला दिले आहेत. त्यानुसार नूतन आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी दिनांक ६ जुलै ते २० जुलै या कालावधीत थकीत कराचा एकरकमी भरणा करणाऱ्या नागरिकांना व्याज शास्ती मध्ये १०० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तरी शहरातील नागरिकांनी या सुवर्ण संधींचा लाभ घेऊन आपल्याकडील थकीत कर महानगरपालिकेकडे भरणा करावा, असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या कर संकलन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## नाशिकमध्ये पावसाचा हाहाकार; मालेगावात घराचा स्लॅब कोसळून ७२ वर्षीय आजीसह २१ वर्षाच्या नातवाचा मृत्यू

**नाशिक/प्रतिनिधी :** जिल्ह्यात दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू आहे. अशात मालेगाव शहरातील कलेक्टर पट्ट्यात राहत्या घराचा स्लॅब कोसळल्यानं ७२ वर्षाच्या आजीसह २१ वर्षाच्या नातवाच्या मृत्यू झाला आहे. या घटनेमुळं परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मालेगाव येथील कलेक्टर पट्टा भागातील महात्मा फ ुले कॉलनीतील रामचंद्र येवले हे आई, कुटुंबासह राहत होते. शुक्रवारी सायंकाळी मुसळधार पावसामुळं त्यांच्या घराच्या हॉलचा भाग कोसळला. त्यात आई विमलबाई येवले आणि नातू चेतन येवले हे दोघेही त्याखाली दबले गेले. घटना घडल्यानंतर शेजारच्यांनी त्यांच्या घराकडं धाव घेतली. त्यांनी स्लॅबखाली दबलेल्या दोघांना बाहेर काढून उपचारासाठी सामान्य रुग्णालयात दाखल केलं. यावेळी रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना तपासून मृत घोषित केलं. या घटनेत प्रणिता येवले (वय २७) ही जखमी झाली आहे. याप्रकरणी छावणी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.कळवण तालुक्यात पावसाची संततधार सुरू आहे. अशात चणकापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जलस्तर वाढल्यामुळं तीन तारखेला (शुक्रवारी) रात्री उशिरा सांडवा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. पर्जन्यमान वाढल्यास विसर्ग वाढवण्याची शक्यता असल्यानं गिरणा काठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असल्यानं जलाशय भरून जात आहेत, त्याचवेळी धोकादायक इमारतीमध्ये राहणाऱ्यांची चिंताही वाढली आहे.

## जालना-बीड महामार्गावर भीषण अपघात! दोन एसटी बसची समोरासमोर धडक; चालकांसह अनेक प्रवासी जखमी

**जालना/प्रतिनिधी :** जालना-बीड महामार्गावर शनिवारी सकाळी भीषण अपघात झाला. अंबड तालुक्यातील शहापूरजवळ गल्हाटी नदीच्या पुलावर अंबड आगाराच्या दोन एसटी बसची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात दोन्ही बसचे चालकांसह सुमारे ३० ते ४० प्रवासी जखमी झाले असून, त्यामध्ये मोठ्या संख्येने शाळकरी विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अपघातानंतर घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेत बचावकार्य सुरू केले. बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढून रुग्णवाहिकांच्या मदतीने अंबड येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याची प्राथमिक माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १७५० क्रमांकाची एसटी बस भाबेरी येथून शाळकरी विद्यार्थ्यांना घेऊन अंबडकडे येत होती. तर ३०२२ क्रमांकाची दुसरी एसटी बस अंबडहून बीडकडे जात होती. सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास शहापूरजवळील गल्हाटी नदीच्या पुलावर दोन्ही बसची समोरासमोर जोरदार धडक झाली. धडकेचा आवाज इतका मोठा होता की परिसरातील नागरिक तत्काळ घटनास्थळी पोहोचले. अपघातामुळे दोन्ही बसच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले. बसमधील अनेक प्रवाशांना दुखापत झाली असून, शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांनाही गंभीर मार लागल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

## ६ जुलैपर्यंत मुसळधार पाऊस-वादळाचा धोका : गरज असेल तरच बाहेर पडा - मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईसह राज्यभरात पावसाने जोरदार हजेरी लावली असून, मुंबई महानगर प्रदेशात सलग कोसळणाऱ्या पावसामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. पावसाचा हा जोर अपेक्षेपेक्षा जास्त असून, येत्या ६ तारखेपर्यंत हे संकट कायम राहणार असल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. तसेच, नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून अनावश्यक प्रवास टाळावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

गेल्या काही दिवसांपासून मुंबई आणि उपनगरांना पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे. रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहतुकीचा वेग मंदावला असून, रेल्वे सेवेवरही याचा मोठा परिणाम झाला आहे. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून प्रशासनाने आधीच मुंबई आणि ठाण्यातील शाळांना सुट्टी जाहीर केली आहे.

शनिवारी आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त आयोजित सहकार गौरव पुरस्कार सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हजेरी लावली. या कार्यक्रमानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी राज्यातील पावसाच्या स्थितीवर सविस्तर माहिती दिली. मुख्यमंत्री म्हणाले, ''राज्यात सध्या मुसळधार पाऊस सुरू असून आम्ही हाय अलर्ट जारी केला आहे. अपेक्षेपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता असल्याने प्रशासनाकडून दर तीन तासांनी अलर्ट दिला जात आहे. नागरिकांनी हा अलर्ट फॉलो करावा आणि गरज नसेल तर प्रवास टाळावा, अशी माझी विनंती आहे.''

पावसाच्या या संकटातच दोन दिवसांपूर्वी मुंबई-पुणे कनेक्टिंग लिंकवर दोन खड्डे पडल्याचे समोर आले होते. यावरून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीकास्त्र सोडले होते. या टीकेला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना चांगलेच सुनावले.

फडणवीस म्हणाले, ''कनेक्टिंग लिंकवर जिथे रस्ते जोडले जातात, तिथे दोन खड्डे पडले आहेत. पूर्ण लिंकवर खड्डे पडलेले नाहीत. काम पूर्ण झाल्यावर पावसाळ्यात दुसरी लेअर टाकली जाते आणि त्यामध्ये काही तांत्रिक अडचणी तपासून पाहिल्या जातात. ही एक इंजिनिअरिंग प्रोसेस आहे. कुठे काही कमतरता असेल तर एमएसआरडीसी योग्य ती काळजी घेऊन दुरुस्ती करेल. पण, काही लोकांना फक्त टीका करण्यातच आनंद मिळतो. हरकत नाही, निंदकाचे घर असावे शेजारी. आपण देशातील सर्वात उंच पूल, रस्ते आणि धरणे बांधली आहेत, त्यामुळे निव्वळ टीका करणे योग्य नाही.

## सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली उद्या लातुरात उपवर्गीकरणाविरोधात भव्य महामोर्चा

**अनुसूचित जाती प्रवर्गातील ५८ जाती समूहांचा सहभाग**

**राजकुमार बडोले, बबनराव घोलप व अमन आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती**

**लातूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाकडून अनुसूचित जातीच्या आरक्षणामध्ये अ, ब, क, ड अशा स्वरूपाचे उपवर्गीकरण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर या निर्णयाविरोधात अनुसूचित जाती प्रवर्ग उपवर्गीकरण विरोधी महामोर्चा कृती समिती, लातूर यांच्या वतीने सोमवार (दि. ६ जुलै) रोजी सकाळी ११ वाजता भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महामोर्चास सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांचे नेतृत्व लाभणार असून माजी मंत्री राजकुमार बडोले, माजी आमदार बबनराव घोलप तसेच युवा नेते अमन आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कृती समितीने प्रसिद्धीस दिलेल्या माहितीनुसार, अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण हा निर्णय आरक्षणाच्या मूळ घटनात्मक उद्देशालाच बाधा पोहोचविणारा असून समान संधीच्या तत्त्वालाही धक्का देणारा आहे. त्यामुळे शासनाने हा प्रस्ताव तात्काळ मागे घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.



समितीच्या म्हणण्यानुसार, अनुसूचित जाती प्रवर्गातील एकूण ५९ जातींपैकी केवळ एका जातीकडून उपवर्गीकरणाची मागणी करण्यात आली असून उर्वरित ५८ जाती समूहांनी या प्रस्तावाला ठाम विरोध दर्शविला आहे. त्यामुळे कोणताही एकतर्फी निर्णय घेऊ नये, असेही समितीने स्पष्ट केले आहे. महामोर्चाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, बौद्धनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून होणार आहे. त्यानंतर शाहू चौक, अण्णाभाऊ साठे पुतळा, गंजगोलाई, हनुमान चौक, बसस्थानक परिसर, गांधी चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, अशोका हॉटेल, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथे मोर्चाची सांगता होईल. त्यानंतर जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

महामोर्चाद्वारे शासनाकडे अनुसूचित जातीच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द करणे, उपवर्गीकरणासाठी नेमलेली समिती बरखास्त करणे, समितीचा अहवाल फेटाळणे, अनुसूचित जातीच्या आरक्षणाची शंभर टक्के प्रभावी अंमलबजावणी करणे, सर्व रिक्त आरक्षित पदे तातडीने भरणे, शिक्षण, शिष्यवृत्ती, वसतिगृहे, संशोधन व उच्च शिक्षणाच्या संधी वाढविणे, लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण किमान २० टक्के करणे तसेच अनुसूचित जातींच्या घटनात्मक हक्कांचे संरक्षण करावे, अशा प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत.

लातूर शहराबाहेरून येणाऱ्या आंदोलकांनी आपली वाहने यशवंत विद्यालय मैदान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क परिसर तसेच पार्कच्या मागील विलासराव देशमुख मार्गावर करून महामोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. संविधानाने प्रदान केलेल्या हक्कांच्या संरक्षणासाठी अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्व समाजबांधव, महिला, युवक, युवती, विद्यार्थी, कर्मचारी, सामाजिक संघटना आणि नागरिकांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून महामोर्चा यशस्वी करावा, असे आवाहन अनुसूचित जाती प्रवर्ग उपवर्गीकरण विरोधी महामोर्चा कृती समिती, लातूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.



## संपादकीय...

### तर मग समाजशील बनण्यात काय अडचण आहे

एखाद्या परिस्थितीचा अर्थ आपण वास्तवाच्या आधारे लावतो की आपल्या सोयीनुसार, यावरच अनेक नाती आणि निर्णय अवलंबून असतात. सोयीच्या अर्थाऐवजी विवेक, सत्य आणि व्यापक दृष्टिकोन स्वीकारण्याची गरज हा लेख अधोरेखित करतो. व्यक्ती आपल्या सोयीनुसार परिस्थितीचा अर्थ लावते, हे वाक्य नेहमी कानावर पडणारे आहे. आपण त्या अनुभवातून गेलेलो असतो. ती प्रक्रिया आपणही केलेली असते, हे माहिती असूनही असे बोलतोच. या वाक्याचा व्यक्तिपरत्वे अर्थ बदलतो. संदर्भ बदलतो. वाक्य तेच, अर्थ अनेक. म्हणजे काय, तर मला ज्या अर्थामध्ये चांगले वाटते, सुख मिळते, आनंद मिळतो, अगदी दु:खही मिळते, तेच म्हणजे आपण त्या परिस्थितीला दिलेला अर्थ होय आणि ही गोष्ट कोणात आधी घडत असेल, तर शत्रू-शत्रूमध्ये. आता हे काही कट्टर शत्रू नसतात. आपल्याच आजूबाजूचे, कधीतरी नातेवाईकही असतात. कधी ही सोय आपल्यावर येणारा आरोप थांबवण्याची असते, कधी कुरघोड्या करण्याची, कधी वादावाद करण्याची, कधी भांडण लावण्याची, तर कधी सूड उगवण्याची. जगात अशी कोणतीच व्यक्ती नाही, जी या वाक्याचा भाग बनली नाही. कधी ते संदर्भ घरी असतात, तर कधी घराबाहेर. हाच काय तो फरक. या वाक्याची फोड केली, तर समजते की, सोय आणि 'परिस्थितीचा अर्थ'. सोय म्हणले की, मला जिथे छान वाटते ते, जसे मला हवे तसे आणि परिस्थितीचा अर्थ लावणे म्हणजे काय, दुसरे तिसरे काही नसून सोय पाहणे असते. सर्वसाधारणत: केवळ परिस्थितीचा अर्थ म्हटले, तर सकारात्मकता आहे; पण याला आधी सोय हा शब्द जोडला की, नकारात्मकता झालीच म्हणून समजा. म्हणून स्वत:ची सोय बाजूला ठेवून परिस्थितीचा अर्थ लावायला शिकलो, तर गैरसोय होत नाही. व्यक्तीकडून हे असे रोखले जात नाही, जाणार नाही. कारण, 'सोयीस' अपवाद कोणीच नाही आणि त्याबाबत प्रत्युत्तर मिळतेच की, 'सोय पाहता आली नाही तर काय कामाचे तुम्ही?' आणि आजकाल तर सोयीनुसार अर्थ लावून त्याचा गाजावाजा केला की, खरेपणाचा आव समोर येतो; पण खरे त्यात काहीच नसते. शून्यातून शून्यात येण्यासारखेच असते ते. तेच लोकांना हवे असते. पटते. मान्य होते. सुख मिळते. आनंद मिळतो. एखाद्या माणसाला कमी कष्टात आनंद मिळत असेल, तर काय हरकत आहे. यापेक्षा काहीही वेगळे नाही. म्हणून सोयीनुसार परिस्थितीचा अर्थ लावण्यापेक्षा परिस्थितीचा सांगोपांग विचार करून अर्थ लावायला हवा. 'सोयीस' अर्थ दिला तर केवळ एका व्यक्तीभोवती फिरणारे ते एक चक्र आहे; पण 'अर्थास' अर्थ दिला, तर तो मार्ग होतो. चक्रामध्ये अडकायचे की, मार्गानुसार चालायचे हेही व्यक्तीवर अवलंबून असते. शेवटी तुम्ही चक्रात अडकाल तितके अडचणीत याल. तितकेच चक्रव्यूहात पडाल. आता ही बाब समजण्याइतपत सोपीही नसते. कारण, आपल्यानुसार एखाद्या घटनेचा अर्थ लावणे जितके सोपे तितके परिस्थितीचा अर्थ लावणे सोपे नसते. अर्थ लावण्यासाठी विवेक हवा, सद्सद्विवेक हवा, जाण हवी, वाचन हवे, चर्चा हवी. त्याशिवाय हे शक्यच नाही; पण आजकाल या बाबी आवडत नाहीत. करण्यास वेळ नाही. हीच समस्या आहे. अजून एक गोष्ट वाखाणण्यासारखी म्हणजे व्यक्ती हा अर्थ लावत असताना कोणतेही संदर्भ पाहत नाही. समोरील व्यक्ती रागात येऊन बोलत असेलही; पण हावभाव साधेच असल्यास आपलाच अर्थ कायम ठेवला जातो. वास्तव काय यापेक्षा वास्तवाअलीकडे काय, हे ठीक वाटते. पलीकडचे आपल्यासाठी महत्त्वाचे नसते. आता या सर्व बाबींमुळे गैरसमज वाढतात. द्वेष वाढतो आणि शीतयुद्धे सुरू होतात. या सर्व परिस्थितींचे पडसाद एकंदरीत समाजमनावर पडते. समाजात अशी मनाने, सोयीने अर्थ लावणाऱ्यांची संख्या वाढली, तर दुरवस्था निर्माण होऊ शकते. संवाद तुटू शकतो व त्याची जागा विसंवाद घेतो. हा असा विसंवाद असतो की, तो नेहमी धुरासारखा पसरतो. हा धूर डोक्यातून उत्पन्न होतो आणि डोक्यामध्येच संपतो. मनुष्य हा समाजात राहणारा, वाढणारा आणि तिथेच मृत पावणारा आहे, तर मग समाजशील बनण्यात काय अडचण आहे; पण तसे होत नाही. मी, माझी सोय आणि सोयीचा अर्थ यापेक्षा वेगळा व्यक्ती विचार करीत नाही. किंबहुना त्या विचारांचे वारेही अशा व्यक्तीस लागत नाही. सर्व काही त्यातच आनंदी-आनंदगडे वाटते; पण हाही विचार करायला हवा की, हा आनंद नसतो, शांतता नसते. हे मानाने मनाची तात्पुरती काढलेली समजूत असते. कारण, सोयीचा अर्थ तेवढ्याच अंतरावरचा असतो. दीर्घकालीन नसतो. म्हणून सोयीपेक्षा वास्तव, सत्य, तत्त्व पाहून अर्थ लावला, तर मन, मेंदू आणि हात याद्वारे योग्य कर्म होणार. त्याचा परिणाम दीर्घकालीन राहणार.

# केंद्र आणि राज्याच्या धोरणांमुळे सहकार क्षेत्राला नवे बळ

## शेतकऱ्यापर्यंत कर्ज व विकास पोहोचविण्यात सहकारी संस्थांची भूमिका निर्णायक- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस






**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राने सहकार चळवळीचे मर्म शंभर वर्षांपूर्वीच समजून घेत शेतकऱ्यांना आर्थिक बळ दिले. आजही सहकार हेच ग्रामीण विकासाचे सर्वात प्रभावी साधन ठरत आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या धोरणांमुळे सहकार क्षेत्राला नवे बळ मिळत असून, शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत कर्ज व विकास पोहोचविण्यात सहकारी संस्थांची भूमिका निर्णायक ठरत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य सहकारी संघ आणि सहकारी महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये आयोजित सहकार गौरव पुरस्कार सोहळ्यात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

सहकार क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या विविध व्यक्ती, संस्था आणि पदाधिकाऱ्यांचा या सोहळ्यात गौरव करण्यात आला. यावेळी विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, उद्योग मंत्री डॉ उदय सामंत, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, सहकार व पुनर्वसन राज्यमंत्री डॉ पंकज भोयर, महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर, आमदार रवींद्र चव्हाण, वारणा सहकार समूहाचे अध्यक्ष आमदार विनय कोरे, आमदार चित्रा वाघ, आमदार अभिजित पाटील, आमदार संजय भेंडे, राज्य सहकारी संघाचे संचालक शिवाजीराव नलावडे, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासकीय अध्यक्ष, विद्याधर अनास्कर, प्रकाश दरेकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्राने सहकार चळवळीचे मर्म पूर्वीच ओळखले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राने सहकार चळवळीचे मर्म खूप पूर्वी ओळखले होते. सव्वाशे वर्षांपूर्वीपासून सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सावकारांच्या जाचातून मुक्त करण्याचा प्रयत्न सुरू झाला. त्यानंतरच्या काळात सहकारी पतपेढी, बँकिंग, कृषी, डेअरी, गृहनिर्माण, मार्केटिंग अशा विविध क्षेत्रांत सहकारी संस्थांची उभारणी झाली. पहिली सहकारी पतपेढी १९०४ मध्ये उभी राहिली, तर १९११ मध्ये शिखर बँकेची स्थापना झाली. धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलराव विखे-पाटील, वैकुंठभाई मेहता यांसारख्या अग्रणी व्यक्तींनी सहकाराला दिलेल्या दिशा-निर्देशांचे स्मरण यावेळी मुख्यमंत्र्यांनी केले.

आता सहकाराला राष्ट्रीय स्तरावर धोरणात्मक महत्त्व मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आज महाराष्ट्रात दोन लाखांहून अधिक सहकारी संस्था कार्यरत असून सहकाराचे सर्वाधिक व्यापक जाळे हे याच राज्यात आहे.सहकार क्षेत्राची खरी ताकद ओळखून ६ जुलै २०२१ रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशात पहिल्यांदाच स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापन केले, याचा विशेष उल्लेख करत मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, पूर्वी सहकाराला फक्त काही राज्यांपुरती मर्यादित चळवळ म्हणून पाहिले जात होते; मात्र आता सहकाराला राष्ट्रीय स्तरावर धोरणात्मक महत्त्व प्राप्त झाले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची पहिल्या केंद्रीय सहकार मंत्रिपदासाठी निवड झाल्याने सहकार क्षेत्राला दूरदृष्टी आणि अनुभव लाभला आहे, असे ते म्हणाले.

राष्ट्रीय सहकार धोरण जाहीर करून पुढील २० वर्षांत देशाच्या जीडीपीमध्ये सहकार क्षेत्राचा हिस्सा तीन पट वाढवण्याचे लक्ष्य केंद्र सरकारने ठेवले आहे. ६३ हजार प्राथमिक कृषी पतसंस्थांचे डिजिटायझेशन, पाच वर्षांत दोन लाख नवीन 'पॅक्स' उभारण्याचा निर्णय, नॅशनल को-ऑपरेटिव्ह एक्सपोर्ट्स लिमिटेड, नॅशनल को-ऑपरेटिव्ह ऑर्गेनिक्स लिमिटेड, भारतीय बीज सहकारी समिती लिमिटेड, अम्ब्रेला ऑर्गनायझेशन आणि केंद्रीय सहकारिता विद्यापीठ अशा विविध उपक्रमांमुळे सहकार क्षेत्राला नवे बळ मिळत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

सहकारी साखर कारखान्यांचा १० हजार कोटी रुपयांचा आयकर माफ करण्याचा निर्णय, इथेनॉल आणि सीबीजी धोरणांमुळे साखर उद्योगाला मिळालेले संजीवनी याचा उल्लेख मुख्यमंत्र्यांनी यावेळी केला. सहकारी संस्थांना ग्रामीण भागात १७ प्रकारची कामे खुली करून एनसीडीसीमार्फत अर्थसाहाय्याची सोय केल्याने सहकार संस्था या ग्रामीण परिवर्तनाचे प्रभावी साधन ठरत आहेत, असे त्यांनी नमूद केले.

सहकारी बँकांची कामगिरी कॉर्पोरेट बँकांपेक्षाही चांगली मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, २१व्या शतकात सहकार जिवंत राहील का, कॉर्पोरेट क्षेत्राशी स्पर्धा करू शकेल का, असा प्रश्न अनेकांना पडला होता; परंतु प्रत्यक्षात सहकारी बँकांनी कॉर्पोरेट बँकांपेक्षाही चांगले काम करून दाखवले आहे. सहकारी संस्थांच्या वित्तीय प्रवेशामुळे विकास वेगाने घडत असून, महाराष्ट्रात शेवटच्या शेतकऱ्याला कर्ज पोहोचविण्याचे काम जिल्हा सहकारी बँका करीत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

मुंबईतील मराठी माणसाचे घराचे स्वप्न स्वयं पुनर्विकासामुळे पूर्ण महाराष्ट्रातील सहकारी संस्थांपैकी ४० ते ४५ टक्के संस्था या सहकारी गृहनिर्माण संस्था असून हा घटक दीर्घकाळ उपेक्षित राहिला होता. मात्र आमदार प्रवीण दरेकर यांच्या पाठपुराव्यामुळे सहकार कायद्यात गृहनिर्माण संस्थांसाठी स्वतंत्र अध्याय तयार करण्यात आला आहे. या आधारावर स्वयं पुनर्विकास योजना तयार करून सहकारी सोसायट्यांना स्वत:च्या पुनर्विकासाचे अधिकार देण्यात आल्याने अनेक कुटुंबांचे मोठ्या घराचे स्वप्न पूर्ण होत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले, मुंबईतील मराठी माणसाचे घराचे स्वप्न स्वयं पुनर्विकासामुळे पूर्ण होत असून ४०० चौरस फुटांवरून १००० चौरस फुटांमध्ये राहायला जाणारे सभासद पाहून होणारा आनंद अवर्णनीय आहे. विद्यमान प्रकल्पांना अर्थसाहाय्य वाढविण्यासाठी सहकारी बँकांनी हजारो पेंडिंग प्रकल्पांना मदत करावी, असे आवाहन यावेळी त्यांनी केले. युडीसीपीआरमधील अडचणी दूर करून मुंबईबाहेरील सहकारी गृहनिर्माण संस्थांनाही स्वयं पुनर्विकास प्रक्रियेत सामावून घेता येईल असे त्यांनी सांगितले.

कॉर्पोरेट जगत सामान्य माणसाला धडकी भरवते; मात्र गावातील सहकारी पतपेढी, सहकारी बँक सामान्य नागरिकांना आपली वाटते, असे सांगत मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले की, लोकाभिमुखता आणि वित्तीय प्रवेश ही सहकाराची ताकद आहे. जिल्हा सहकारी बँकांचे संचालक लोकशाही प्रक्रियेतून निवडले जात असल्याने त्यांची सामान्य शेतकऱ्याशी बांधिलकी राहते. व्यावसायिक आणि राष्ट्रीयीकृत बँकांनीही अशी बांधिलकी जपावी असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

विधानसभा अध्यक्ष ॲड राहूल नार्वेकर म्हणाले, सहकार आणि लोकशाही या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. संविधानात सहकार क्षेत्राचा विशेष उल्लेख लोकशाही बळकटीसाठी महत्त्वाचा आहे. विकास प्रक्रियेत प्रत्येक नागरिकाचा सहभाग सहकार चळवळीतूनच व्यापक पद्धतीने शक्य होतो, असे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले.

सहकार विषयावर लिहिणाऱ्या लेखकांनाही यापुढे राज्य सरकारच्या वाङ्मय पुरस्कारांत समाविष्ट करण्यासंदर्भात प्रस्ताव असल्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ उदय सामंत यांनी सांगितले.

पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करत सहकार क्षेत्रातील साहित्य निर्मिती आणि संस्थात्मक कामांना राज्य सरकारकडून आवश्यक ते सहकार्य दिले जाईल, असे डॉ सामंत यांनी सांगितले.

सहकार चळवळ राज्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचवण्याचे आवाहन सहकार व गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी पुरस्कार विजेत्यांना केले.

देशातील सहकार चळवळीत महाराष्ट्राचा सर्वाधिक वाटा असून सहकारातूनच समाजाची समृद्धी साध्य होऊ शकते, असे मंत्री डॉ. भोयर यांनी नमूद केले.

सहकार क्षेत्र मजबूत करण्यासाठी शिक्षण निधी तातडीने सुरू करून प्रलंबित धोरणांची अंमलबजावणी करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांनी केली.

सहकार क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव

पुरस्कार वितरण सोहळ्यात विविध क्षेत्रांतील सहकार क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात आला. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासकीय अध्यक्ष विद्याधर अनास्कर यांना 'सहकार महर्षी पुरस्कार', वारणा सहकार समूहाचे अध्यक्ष आमदार विनय कोरे यांना 'सहकार भूषण पुरस्कार', भगिनी निवेदिता सहकारी बँक, पुणेच्या अध्यक्षा डॉ. रेवती पैठणकर यांना 'सहकार रत्न पुरस्कार', महाराष्ट्र राज्य पतसंस्था फ ेडरेशनचे अध्यक्ष दिपक पटवर्धन यांना 'सहकार गौरव पुरस्कार', अण्णासाहेब सावंत नागरी सहकारी बँकेच्या अध्यक्षा श्रीमती शोभाताई सावंत यांना 'महिला सहकार शक्ती पुरस्कार' तसेच सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ नेते शिवाजीराव नलावडे यांना 'सहकार विभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

याचबरोबर विभागीय सहनिबंधक शहाजी पाटील, सहकार विभागाचे सहसचिव संतोष पाटील आणि जिल्हा उपनिबंधक राजेश लव्हेकर यांना 'सहकार प्रेरणा पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष सिद्धार्थ कांबळे, मुंबई हाऊसिंग फेडरेशनचे अध्यक्ष प्रकाश दरेकर आणि चारकोप अभिलाषा गृहनिर्माण सहकारी संस्थेचे श्रीकांत कवठणकर यांना 'सहकार नवोन्मेष पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

गडचिरोली जिल्हा आदिवासी बांबू प्रक्रिया सहकारी संस्थेचे आमदार नामदेव उसेंडी यांना 'सहकार ग्राम विकास पुरस्कार' देण्यात आला. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्याधिकारी राजेंद्र सरकले यांना 'सहकार बँकिंग उत्कृष्टता पुरस्कार' प्रदान करण्यात आला. अमरावती येथील शरदमाई विविध कार्यकारी संस्थेचे संजय सुणे नंदुरबार येथील प्रकाशा विविध कार्यकारी संस्थेचे दिलीप पाटील आणि यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी येथील श्रद्धेय आबासाहेब देशमुख पारवेकर विविध कार्यकारी संस्थेचे सचिन देशमुख पारवेकर यांना 'सहकार कृषी रत्न पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्हा दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष विजय उत्तमराव काळे आणि लाडसावंगी विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे अध्यक्ष गोकुळ तोताराम राजपूत यांना 'दूध उत्पादक व सेवा सोसायटी पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

याशिवाय सेकंडरी स्कूल एम्पलॉइज को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांना 'सहकार समाज सेवा पुरस्कार', महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे माजी अध्यक्ष अशोक जगताप यांना 'सहकार नेतृत्व पुरस्कार', ज्ञानदीप सहकारी पतसंस्थेचे व्ही. जी. पवार यांना 'आदर्श सहकारी संस्था पुरस्कार', गोराई सहकारी मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष ऑल्विन वसईकर यांना 'सहकार उद्योग पुरस्कार', दि मुंबई अन्नधान्य दल फ ेडरेशनचे अध्यक्ष दशरथ घनवट यांना 'सहकार परिवर्तन पुरस्कार' आणि मार्केटिंग फेडरेशन, महाराष्ट्र राज्यचे अध्यक्ष रोहित निकम यांना 'युवा सहकार पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

# महाळग्रा येथील शेतकरी कुटुंबाला शासकीय मदत

## सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते धनादेश सुपूर्द

**लातूर/प्रतिनिधी** :चाकूर तालुक्यातील महाळग्रा येथील शेतकरी शिवाजी शिंदे यांचे विजेचा धक्का बसल्याने निधन झाले होते. या संकटसमयी शिंदे कुटुंबाला शासनाकडून आर्थिक दिलासा मिळाला आहे. राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे महावितरणच्या वतीने मंजूर करण्यात आलेला ३ लाख ८० हजार रुपये मदत निधीचा धनादेश त्यांच्या कुटुंबियांना सुपूर्द करण्यात आला.

शेतकरी शिवाजी शिंदे यांच्या निधनानंतर सहकार मंत्री श्री. पाटील यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबाचे सांत्वन केले होते व शासनाकडून सर्वतोपरी आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार त्यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला.

या पाठपुराव्याला यश येऊन महावितरणकडून मदत निधी मंजूर करण्यात आला. सहकार मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते हा धनादेश शिंदे यांच्या वारसांना वितरित करण्यात आला. या प्रसंगी महावितरणचे उपविभागीय अभियंता कुणाल पेन्सलवार, जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, समाज कल्याण सभापती उत्तमराव माने आदी उपस्थित होते.



# आनंद गायकवाड ग्रंथालय आणी माहितीशास्त्र या पदवीत्तर पदवी (मास्टर डिग्री) परिक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

**केज/प्रतिनिधी :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक अंतर्गत स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, आंबाजोगाई या सेंटरमधून मे / जुन २०२६ मध्ये परिक्षा घेण्यात आली होती. २०२५ - २० २६ या वर्षासाठी हि अंतिम परिक्षा होती.आनंदगांव ता. केज जि. बीड येथील आनंद वसुदेवराव गायकवाड ( भैय्या ) हे एम. लिब आणि आयएस्सी/ ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या पदवीत्तर पदवी( मास्टर डिग्री )या क्षेत्रातील सर्वोच्च परिक्षेत ६९.८८ % गुण घेवून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. यशस्वी झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. मे /जुन २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या परिक्षेत ६९.८८ % गुण घेवून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या बद्दल आनंद भैय्या गायकवाड यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

या परिक्षेचा भाग म्हणून आनंद गायकवाड यांनी '' आनंदगांव येथील स्वानंद सार्वजनिक वाचनालयाचा शासकीय अनुदानातून व वाचक वर्गणीतून झालेला विकास: एक अभ्यास हा विषय निवडून संशोधन कार्य पूर्ण केले. या संशोधन प्रकल्पासाठी १०० पैकी ८६ गुण वियापीठाने दिले. हासंशोधन प्रकल्प संशोधनमार्गदर्शक प्रा. डॉ. भाऊराव मुंडे यांच्या मार्गनात विद्यापीठाला सादर करण्यात आला होता. तसेच आनंद भैय्या गायकवाड यांनी '' ज्ञानाधिष्ठित समाजासाठी ग्रंथालय शास्त्राच्या पाच सिद्धांताची उपयुक्तता या विषयावर १२ पानी शोधनिबंध सादर केला होता.

मास्टर ऑफ लायब्ररी अँड इन्फर्मेशन सायन्स मे/ जुन २०२६ या परिक्षेत ६९.८८ % गुण घेवून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेले. याबद्दल केंद्र संयोजक प्रा. डॉ. पी. सी. गादेकर, संशोधन मार्गदर्शक प्रा. डॉ. भाऊराव मुंडे, प्रा. डॉ. काकडे, बहिस्थ परिक्षण प्रा. डॉ. मधुबाला, प्रा. मिश्रा यांनी अभिनंदन केले.

तसेच स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड यावर संशोधन प्रकल्प विद्यापिठाला सादर केल्याबद्दल तसेच या ग्रंथालयाचे संचालक व मुख्य कामकाज करून न ग्रंथालय क्षेत्रातील हि सर्वोच्च पदवीत्तर पदवी( मास्टर डिग्री) मिळविल्या बद्दल ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, डॉ. वसुदेव



बप्पा गायकवाड, छायाताई सोमवंशी, सुमनताई गायकवाड, मुरलीधर शिंदे, ज्ञानोबा भोगजकर, व्यंकटी वैरागे तसेच आज्जी भागीरथी आक्का गायकवाड, रामकृष्ण तात्या गायकवाड, ज्ञानोबाकाका गायकवाड, नवनाथ बापू गायकवाड, मंगलकबई शिंदे, जान्हवीकाकू पतंगे, सविताताई लगड, इंजि. अनिल गायकवाड, बँक ब्रँच मॅनेजर गणेश गायकवाड, प्रा. लक्ष्मी गायकवाड, दुर्गा गायकवाड, ओम गायकवाड,सिंधुबाई गायकवाड, वैशालीबाई गायकवाड, रुक्मीनबाई गायकवाड,सुधीरभाऊ रानमारे, प्रतापभाऊ भाकरे, मधुक भाकरेमामा, अर्जुन बचुटे, प्राचार्य बळवंत शिंदे सर, प्रा.वैजनाथ जाधव, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय कमचारी संघाचे संस्थापक व केंद्रिय कार्यवाह नंदूभाऊ बनसोड व मित्रपरिवाराकडून अभिनंदन होत आहे.

# पत्रकारीतेत डिजीटल माध्यमाचा प्रभावी वापर करा- कलादिग्दर्शक संतोष संखद

## दयानंद कला महाविद्यालयात डिजीटल पत्रकारिता कार्यशाळा संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** पत्रकारीतेत पत्रकारांनी सोशल मीडिया, युट्युब, फेसबुक, इंस्टाग्राम, वेब आदी डिजीटल माध्यमाचा प्रभावी वापर करावा असे आवाहन चित्रपट कलादिग्दर्शक व प्रशिक्षक संतोष संखद यांनी लातूर येथील दयानंद कला महाविद्यालयात आयोजित डिजीटल पत्रकारिता कार्यशाळेत केले. कार्यक्रमाची सुरुवात आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर व भारतीय संविधानाच्या पुजन करून करण्यात आली.

लातूर येथे भारतीय पत्रकार संघ, लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघ, दयानंद कला महाविद्यालय लातूर आणि आंबेडकराईट फिल्म मेकर्स असोसिएशन च्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक ४ जुलै २०२६ रोजी डिजीटल पत्रकारिता कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी दयानंद कला महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. अंजली जोशी या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून लातूर विभागीय माहिती कार्यालयाचे सहाय्यक संचालक डॉ. शाम टरके यांची प्रमुख उपस्थिती होती. तर मंचावर लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष रविकिरण सुर्यवंशी मसलगेकर, लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघाचे संस्थापक सचिव तथा भारतीय पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष



दत्तात्रय परळकर आदींची उपस्थिती होती.

या कार्यशाळेत प्रसिद्ध कलादिग्दर्शक व प्रशिक्षक संतोष संखद यांनी प्रशिक्षणादरम्यान डिजीटल पत्रकारितेतील कॅमेरा ॲंगल, प्रभावी व्हीडिओ निर्मिती, सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर, युट्यूब व फेसबुक, इंस्टाग्राम, वेब वरील कंटेटची मांडणी, प्रेक्षक संख्या वाढविण्याच्या पध्दती, लाईक, सबस्क्राईब आणि डिजीटल प्लॅटफॉर्म वरील यशस्वी उपस्थितीसाठी आवश्यक तांत्रिक बाबी याविषयी सखोल मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित पत्रकार बांधवांना मान्यवरांच्या हस्ते सहभाग प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यशाळेला पत्रकार राजकुमार गुडाप्पे, सितम सोनवणे, डी. एल. वाघमारे, राम रोडगे, मारोती माने, शिवाजी कांबळे, खंडेराव देडे, शिरीषकुमार शेरखाने, सुनील कांबळे आदींसह लातूर येथील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्तात्रय परळकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांनी केले तर आभार पत्रकार अमोल घायाळ यांनी मानले.

## घरात घुसून तरुणीचे अपहरण : बंदुकीचा धाक दाखवत नराधमाची कुटुंबीयांना मारहाण; रोख रक्कम, दागिने लंपास

**पुणे/प्रतिनिधी** : दौंड तालुक्यातील बोरीभडक इथं एका २३ वर्षीय तरुणीचं घरात घुसून अपहरण केल्यानं मोठी खळबळ उडाली आहे. यावेळी तरुणीच्या आई-वडिलांनी या नराधमाला अडवण्याचा प्रयत्न केला असता, त्यानं पिस्तूल काढून त्यांना गोळ्या घालून ठार मारण्याची धमकी दिली. यानंतरही मुलीच्या वडिलांनी पीडितेला सोडवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे अपहरणकर्त्या नराधमानं त्यांना धक्का देत मारहाण केल्याची घटना घडली आहे. यावेळी ५ लाख १ हजार रुपये आणि ७ तोळे दागिने या नराधमानं चोरून नेल्याचा आरोपही अपहरण झालेल्या तरुणीच्या वडिलांनी आपल्या तक्रारीत केला आहे. ''या प्रकरणी यवत पोलीस स्टेशनमध्ये कमरुद्दीन मुकीम शेख आणि त्याच्या दोन साथीदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे,'' अशी माहिती यवत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर यांनी दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बोरीभडक येथील तरुणीला हडपसर येथील कमरुद्दीन मुकीम शेख हा काही दिवसांपासून त्रास देत होता. त्यामुळे कुटुंबीयांनी तिला घराबाहेर जाण्यास मनाई केली होती. २ जुलै २०२६ रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास आरोपी कमरुद्दीन शेख हा दोन साथीदारांसह पीडितेच्या घरात घुसला. त्यानं तरुणीला जबरदस्तीनं ओढून नेत असताना कुटुंबीयांनी त्याला विरोध केला. त्यावेळी आरोपीनं पिस्तूल दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच पीडितेचे वडील, आजोबा व आई यांना मारहाण केली. आरोपीने तिच्या आईशी गैरवर्तन करून शिवीगाळही केली, असं तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

आरोपींनी घरातील नर्सरी व्यवसायासाठी ठेवलेली ५ लाख एक हजार ५०० रुपये रोख रक्कम तसेच सात तोळ्याचे सोन्याचे दागिने जबरदस्तीने लंपास केले. त्यानंतर पीडितेला बाहेर उभ्या असलेल्या चारचाकी वाहनात बसवून आरोपींनी तिचे अपहरण करून घटनास्थळावरून पलायन केले.

## राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलाकार सन्मान योजनेसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलाकार सन्मान योजनेंतर्गत कला व साहित्य क्षेत्रातील योगदान असणाऱ्या १०० ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना प्रति महिना रू. ५०००/- (अक्षरी पाच हजार रुपये फक्त) मानधन देण्यात येते. यासाठी पात्र लाभार्थींना १ ते ३१ जुलैपर्यंत ऑनलाईन आपले सरकार पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन मुंबई शहरच्या निवासी उपजिल्हाधिकारी यांनी केले आहे.

या योजनेसाठी लाभार्थींची पात्रता पुढीलप्रमाणे आहे. लाभार्थीचे वय ५० वर्षापेक्षा जास्त असावे. दिव्यांगाना वयाची अट १० वर्षाने शिथिल करण्यात आली आहे. त्यांची वयोमर्यादा ४० वर्षे आहे. कला व साहित्य क्षेत्रात योगदान कमीत कमी १५ वर्षे असावे. वयाने ज्येष्ठ असणारे विधवा, परित्यक्त्या, दिव्यांग कलाकारांना प्राधान्य राहील. कलाकारांचे वार्षिक उत्पन्न ६० हजारापेक्षा जास्त नसावे. ज्या कलाकारांची उपजिवीका फक्त कलेवरच अवलंबून आहे. त्यांना कोणत्याही मार्गाने उत्पन्न नाही असे कलाकार पात्र राहतील. ते केंद्र व राज्य शासनाच्या महामंडळ व कोणत्याही नियमित मासिक पेन्शन योजनेत अंतर्गत नसावे. कलाकार महाराष्ट्राचा रहिवासी असणे बंधनकारक आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांनी मुदतीत आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावा. असे आवाहन, निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई शहर डॉ. शिवनंदा लंगडापुरे यांनी केले आहे.

अर्जासोबत आवश्यक असणारी कागदपत्रे वयाचा दाखला, आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, प्रतिज्ञापत्र, पति-पत्नी एकत्रित फोटो (लागू असल्यास), बँक पासबूक, अपंगत्व दाखला (लागू असल्यास) राज्य व केंद्र सरकारचे प्रमाणपत्र (लागू असल्यास), नामांकित संस्था, व्यक्ती यांचे शिफारसपत्र (लागू असल्यास) यासह विविध पुरावे, आदी कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

## १७ वर्षीय हितेनने रचला जागतिक इतिहास: सर्वात लहान रोबोटिक आर्मने मोडला गिनीज विक्रम

**नागपूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील स्कूल ऑफ स्कॉलर्स शाळेचा १७ वर्षीय विद्यार्थी हितेन धारपुरे याने अभूतपूर्व यश संपादन केलेय. त्याने जगातील सर्वात लहान पूर्णपणे कार्यक्षम रोबोटिक आर्म विकसित करून गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावे केला आहे. केवळ ३९.२५० मिलिमीटर आकाराच्या या रोबोटिक आर्मने अमेरिकेतील पूर्वीचा ४४.४९ मिलिमीटरचा विक्रम मोठ्या फरकाने मोडला आहे. या यशाने केवळ नागपूर आणि महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण भारताचा जागतिक स्तरावर गौरव झाला आहे. मर्यादित संसाधन, नावीन्यपूर्ण कल्पना आणि दृढ निश्चयाने मोठे यश मिळवता येते, असे हितेनच्या या प्रकल्पाने दाखवून दिले आहे. या रोबोटिक आर्मची निर्मिती केवळ दोन महिन्यांत पूर्ण झाली. ही कामगिरी युवा भारतीयांच्या वैज्ञानिक क्षमतेचे उत्तम उदाहरण आहे.

यापूर्वी हा विक्रम अमेरिकेतील इंडियाना येथील केल्टन सेरा यांच्या नावे होता. त्यांनी तयार केलेल्या ४४.४९ मिलिमीटर आकाराच्या ३डी-प्रिंटेड रोबोटिक आर्मला गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड मिळाला होता. हितेननं मात्र केवळ ३९.२५० मिलिमीटर आकारात अत्यंत अचूक आणि कार्यक्षम रोबोटिक आर्म तयार करून हा विक्रम खूप मोठ्या फरकानं मोडला. हा रोबोटिक आर्म पूर्णपणे इलेक्ट्रोमेकॅनिकल आहे. तो मानवी हाताप्रमाणे विविध गुंतागुंतीची कार्ये करू शकतो. त्यात मायक्रो सर्वो मोटर्स आणि उच्च अचूकतेचं पीडब्ल्यूएम कंट्रोल मॉड्यूल वापरण्यात आलं आहेत.

हा आर्म तीन स्वतंत्र अक्षांवर हालचाल करू शकतो आणि अतिशय लहान वस्तूही अचूकपणे पकडण्याची क्षमता त्याच्यात आहे.

तंत्रज्ञान आणि प्रकल्पातील आव्हाने : हितेनने या प्रकल्पासाठी सहज उपलब्ध तंत्रज्ञानाचा वापर केला. एफडीएम ३डी प्रिंटिंग तंत्रज्ञानाद्वारे त्याने स्वत: कस्टम चेसिसची रचना तयार केली. संपूर्ण मॉडेलची रचना अत्याधुनिक उअऊ (उेाििीींशी अळवशव ऊशीळसप) सॉफ्टवेअरच्या साहाय्यानं सुरुवातीपासून तयार करण्यात आली. सर्वात मोठे आव्हान होतं ते म्हणजे अत्यंत छोट्या जागेत सर्वो मोटर्स, वायरिंग आणि इतर घटकांची अचूक मांडणी करणे. मायक्रो-मॅन्युफॅक्चरिंगच्या भौतिक मर्यादा ओलांडून उच्च अचूकता साधणे हे हितेनसमोरचं मुख्य आव्हान होतं. मात्र, त्यानं अपार मेहनत आणि सर्जनशीलतेनं ते यशस्वीरित्या पूर्ण केलं.

विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी यश : हितेनचं हे यश डढएच (डलळशपलश, ढशलहपेश्रेसू, एपसळपशशीळपस रपव चरींहशारींळली) क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोठी प्रेरणा आहे. मर्यादित जागेत आणि उपलब्ध साधनांसह उच्च दर्जाचे रोबोटिक्स विकसित करता येते, हे या प्रकल्पानं सिद्ध केलं आहे. पुस्तकी ज्ञानापलीकडे जाऊन प्रात्यक्षिक आणि नवोन्मेष करणे किती महत्त्वाचे आहे, हे यावरून दिसून येतं. दृढ निश्चय, नावीन्यपूर्ण विचार आणि तांत्रिक कौशल्य यांच्या बळावर जगात आपली ओळख निर्माण करता येते, हा संदेश हितेनच्या यशातून मिळतो. सध्या हितेनच्या या ऐतिहासिक कामगिरीचं विविध स्तरांतून कौतुक होत आहे. महाराष्ट्र सरकार, शिक्षण संस्था आणि विज्ञान प्रेम ींकडून त्याला शुभेच्छा मिळत आहेत. हितेनचे हे यश केवळ वैयक्तिक नाही तर संपूर्ण युवा पिढीला प्रोत्साहन देणारे आहे.

# भरधाव पिकअपची धडक; वैभव कराडचा उपचारादरम्यान मृत्यू

**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील तांबवा शिवारातून गेलेल्या केज - धारूर महामार्गावर गुरुवारी ६-०० वाजण्याच्या दरम्यान मद्यधुंद चालकाच्या ताब्यातील भरधावं पिकअपने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वैभव इंद्रमोहन कराड या २६ वर्षीय तरुणाला जोराची धडक देऊन जखमी केले होते. स्वाराती रुग्णालयात उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला. वैभव इंद्रमोहन कराड हे गुरूवारी दिनांक ३जून रोजी सायंकाळी ६-०० वाजण्याच्या दरम्यान तांबवा शिवारातील विठ्ठलवाडी परिसरातील आपल्या शेताजवळ, केज- धारूर महामार्गाच्या कडेला उभे होते. यावेळी केज येथून धारूर कडे जाणाऱ्या पिकअप क्र. एम एच ४४-यु२२७० च्या चालकाचा आपल्या वाहनावरील ताबा सुटल्याने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वैभव कराड यास पिकअपने जोराची धडक दिली. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी जखमी वैभव कराड यांना उपचारासाठी केज येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल






केले. तेथून त्याला पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात दाखल केले आसता उपचारादरम्यान रात्री साडे बारा वाजण्याच्या दरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. शुक्रवारी सकाळी तांबवा येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. वैभव कराड च्या पश्चच्यात आई, वडील, भाऊ, पत्नी आणि छोटी मुलगी असा परिवार आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक असद शेख,सहाय्यक फौजदार प्रल्हाद चव्हाण, जमादार फुलचंद सानप, उमेश आघाव, व महावीर सोनवणे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. व अपघातास कारणीभूत ठरलेले पिकअप केज पोलीस ठाण्यात लावला आसून पिकअप चालक फरार झाला आहे. पीकअप चालकाने मद्यधुंद अवस्थेत पिकअप चालवून वैभव इंद्रमोहन कराड याच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्या प्रकरणी वडील इंद्रमोहन कराड यांच्या फिर्यादीवरून अज्ञात पिकअप चालका विरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे.पुढील तपास पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार प्रल्हाद चव्हाण हे पुढील तपास करीत आहेत.

## वसई विरारमध्ये पाणी साचल्यामुळे चाकरमान्यांचे हाल! ट्रॅक्टरमधून प्रवास करण्याची वेळ

वसई : वसई विरार शहरात शनिवार सकाळपासूनच मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. तर मुसळधार पावसामुळे शहरातील रस्ते पाण्याखाली गेले असून वाहतूक सेवा कोलमडल्यामुळे नागरिकांना चक्क ट्रॅक्टरमधून प्रवास करावा लागत आहे. पालघर जिल्ह्यात आज हवामान विभागाने मुसळधार ते अतीमुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता वर्तवली होती. त्यानुसार सकाळपासूनच मेघगर्जनांसह पाऊस कोसळायला सुरुवात झाली आहे. मुसळधार पावसामुळे तसेच पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी पुरेसे मार्ग नसल्याने वसईतील आक्टन, गिरीज, बंगली, दीनदयाल नगर, रेंज ऑफिस, तुंगारेश्वर, सातिवली, मधुबन, विरारमधील राजोडी, उंबरगोठण, कुंभारपाडा, विराटनगर, ग्लोबल सिटी, नालासोपाऱ्यातील गास, येथील कोळीवाडा, सनटेक आणि रेल्वे स्थानक परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले आहे.

गुडघाभर साचलेल्या पाण्यातून दुचाकीचालकच नव्हे तर चारचाकी चालक, रिक्षा आणि अगदी परिवहनच्या बस चालकांना देखील मार्ग काढणे कठीण होऊन बसले आहे. त्यामुळे लांब पल्ल्याचा प्रवास करणारे, गावपाड्यातून तसेच शहराच्या अंतर्गत भागातून प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांचे यामुळे हाल होत आहेत. ठाणे, पालघर जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे शाळा महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली असली तरी चाकरमान्यांना मात्र कार्यालय गाठावे लागत आहे. त्यामुळे आता कामावर जाणारे आणि कामावरून परतणाऱ्या नागरिकांना ट्रॅक्टरमधून प्रवास करावा लागत आहे.

गेल्यावर्षी सुद्धा ऑगस्ट महिन्यात पडलेल्या पावसामुळे परिवहन सेवेवर अशाच पद्धतीने परिणाम झाला होता. त्यामुळे नागरिकांना ट्रॅक्टरमधून प्रवास करावा लागला होता.

# श्री श्री रविशंकर विद्यामंदिर विद्यालयात १३० विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी

## एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व रुग्णालयाचा समाजोपयोगी उपक्रम

**लातूर/प्रतिनिधी :** डॉक्टर्स दिनानिमित्त एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व रुग्णालय, लातूर यांच्या वतीने श्री श्री रविशंकर विद्यामंदिर विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी मोफत दंत तपासणी व मौखिक आरोग्य जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात १३० विद्यार्थ्यांची दंत तपासणी करण्यात आली.

तपासणीदरम्यान विद्यार्थ्यांच्या दातांतील किड, हिरड्यांचे आजार तसेच इतर दंत समस्यांची तपासणी करून आवश्यक उपचार व प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. वरिष्ठ दंत चिकित्सक डॉ. सोमनाथ गित्ते, निवासी डॉ. अनुष्का पडवी व डॉ. निशिगंधा कांबळे यांनी विद्यार्थ्यांची






तपासणी केली. आंतरवासिता मेघा पाटील यांनी मौखिक स्वच्छतेचे महत्त्व, योग्य पद्धतीने दात घासण्याची पद्धत, संतुलित आहार आणि नियमित दंत तपासणीची गरज याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी आंतरवासिता गायत्री पांचाळ, सोफिया पटेल आणि तनुष्या पुनरकर यांनी सक्रिय सहभाग घेतला. शिबिराचे समन्वयन श्री ज्ञानोबा केंद्रे यांनी केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे यांनी डॉक्टर्स दिनाच्या शुभेच्छा देताना सांगितले की, ''बालवयापासून दंत आरोग्याच्या योग्य सवयी जोपासल्यास निरोगी समाज घडण्यास मोठी मदत होते. समाजाभिमुख आरोग्यसेवा आणि जनजागृतीसाठी एमआयडीएसआर दंत महाविद्यालय भविष्यातही अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करत राहील.

यावेळी विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती प्रमिला राऊळ, शाखा समन्वयक श्रीमती सुष्मिता सगरे तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते.

## गुड न्यूज! आता महाराष्ट्र शासनाचे थेट अपडेट्स मिळणार 'व्हॉट्सप' चॅनल आणि 'पब्लिक ॲप' वर!

**मुंबई/प्रतिनिधी :** समाजमाध्यमांच्या विविध प्लॅटफॉर्म्सद्वारे नागरिकांपर्यंत अचूक, अधिकृत आणि वस्तुनिष्ठ माहिती पोहोचविणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने आता 'व्हॉट्सप' चॅनल आणि 'पब्लिक' ॲप वर अधिकृत, प्रमाणित खाती सुरू केली आहेत.

आता नागरिक 'व्हॉट्सप' चॅनलवर DGIPR, Govt of Maharashtra या नावाने, तर पब्लिक पवर महाराष्ट्र शासन (mahadgipr) या नावाने शासकीय घडामोडींचे थेट अपडेट्स मिळवू शकतील. या दोन्ही प्लॅटफॉर्म्समुळे जनतेपर्यंत अधिक गतीने, अचूक, अधिकृत आणि वस्तुनिष्ठ माहिती थेट आणि व्यापक स्वरूपात पोहोचण्यास मोठी मदत होणार आहे.

शासन आणि जनतेला जोडणारा महत्त्वाचा दुवा आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धीच्या कामाचे संपूर्ण समन्वयन करणारी यंत्रणा म्हणून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची ओळख आहे. शासनाचे विविध लोकोपयोगी उपक्रम, योजना जनतेपर्यंत पोहोचविणे आणि त्याबाबतच्या जनतेच्या प्रतिक्रिया शासनापर्यंत पोहचविण्याची दुहेरी जबाबदारी महासंचालनालय पार पाडत असते. हे काम करताना डिजिटल क्रांतीचा पुढचा टप्पा म्हणून महासंचालनालयाने हायपरलोकल कंटेंट देणाऱ्या 'पब्लिक ॲप' वर आणि 'व्हॉट्सप चॅनल' वर आपली उपस्थिती नोंदवली आहे.

**महाराष्ट्र शासनाचे अधिकृत अपडेट्स हवे आहेत? मग खालील लिंक्सवर क्लिक करून आजच जॉईन व्हा :**

- व्हॉट्सप चॅनल: https://whatsapp.com/channel/0029VbBTiPx5Ui2ZR3iQwV3I
- पब्लिक ॲप: https://public.app/user/profile/aaSpb26TIpVKSSUlGc7wkCx-1to1
- महासंवाद: https://mahasamvad.in/
- एक्स (ट्विटर): https://twitter.com/MahaDGIPR
- फेसबुक: https://www.facebook.com/MahaDGIPR
- इन्स्टाग्राम: https://www.instagram.com/mahadgipr
- युट्यूब: https://www.youtube.com/M-H-R-SHTR-DGIPR
- टेलिग्राम: https://t.me/MahaDGIPR
- डेलिहंट: https://profile.dailyhunt.in/mahasamvad

अफवांवर विश्वास ठेवू नका! शासनाच्या अधिकृत आणि खात्रीशीर माहितीसाठी वरील चॅनेल्सना नक्की फॉलो करा

## वसई सकवार येथे पुरात अडकलेल्या १३ जणांची अग्निशमन दलाकडून सुखरूप सुटका!

**वसई/प्रतिनिधी** : वसई-विरार शहरात गेल्या काही तासांपासून कोसळत असलेल्या मुसळधार पावसाने अक्षरश: धुमाकूळ घातला आहे. शहरातील बहुतांश भाग जलमय झाला असून, या पुराचा फटका केवळ शहरी भागालाच नाही, तर ग्रामीण भागालाही मोठ्या प्रमाणावर बसला आहे. दरम्यान, वसई पूर्वेकडील सकवार येथे पुरात अडकलेल्या १३ नागरिकांची प्रशासनाने वेळीच धाव घेत सुखरूप सुटका केली आहे. वसई पूर्वेच्या मुंबई-अहमदाबाद महामार्गालगत असलेल्या सकवार भागात पावसाचे प्रचंड पाणी साचले आहे. या साचलेल्या पुराच्या पाण्यात विरार येथे राहणारे १३ नागरिक अडकून पडले होते. वेगाने वाढणाऱ्या पाण्याच्या पातळीमुळे अडकलेल्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

या घटनेची माहिती मिळताच वसई-विरार म हानगरपालिका, तहसील कार्यालय आणि पोलीस प्रशासनाने तात्काळ घटनास्थळी तातडीने अग्निशमन दलाच्या जवानांना पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाच्या जवानांनी कसलीही वाट न पाहता बोटीच्या साहाय्याने मदतकार्य सुरू केले आणि पुरात अडकलेल्या सर्व १३ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात आल्याची माहिती तहसील विभागाने दिली आहे.

## धक्कादायक! दिड वर्षाच्या चिमुकल्यासह आईने मारली मांडवी एक्सप्रेसमधून उडी

**रत्नागिरी/प्रतिनिधी** : रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातून एक अत्यंत धक्कादायक मन सुन्न करणारी घटना समोर आली आहे. शुक्रवार ३ जुलै रोजी संध्याकाळी साडे सहाच्या सुमारास ही घटना घडली. मडगावहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या धावत्या मांडवी एक्सप्रेसमधून एका म हिलेने आपल्या लिव्ह-इन पार्टनर आणि अवघ्या दीड वर्षाच्या निष्पाप चिमुकल्यासह मुसळधार पावसात बाहेर उडी घेतल्याचा थरार घडला आहे.

नेमकं प्रकरण काय ? मडगावहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मांडवी एक्सप्रेसमधून महिलेने आपल्या लिव्ह-इन पार्टनर आणि अवघ्या दीड वर्षाच्या निष्पाप चिम ुकल्यासह मुसळधार पावसात उडी मारली. या घटनेत उडी मारलेल्या महिलेचं नाव शुभ्रा अतिश दिवेकर असे आहे. या महिलेने रेल्वे ट्रॅकवर उडी मारून आपलं जीवन संपवलं. तिच्या सोबत तिचा लिव्ह-इन पार्टनर सचिन सत्यवान जुवळे आणि त्यांचा दीड वर्षाचा लहान मुलगा याच वेळी त्यांनी सुद्धा उडी मारली मात्र सुदैवाने त्यांचा जीव वाचला असून सध्या रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार :

मुसळधार पाऊस आणि वेगाने धावणारी रेल्वे असल्याने उडी मारल्यानंतर तिघेही लोहमार्गाच्या बाजूला रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. मेटे गावाच्या परिसरात काहीतरी पडल्याचा आवाज आल्यानंतर आणि रेल्वे प्रशासनाला संशय आल्यानंतर तातडीने खेड पोलीस आणि रेल्वे पोलिसांना पाचारण करण्यात आले.

# लातूरचा मान उंचावणारा अभिनेता! घवडकुंडच्या यशाने रॉकी देशमुख महाराष्ट्रभर चर्चेत

### दमदार अभिनयाला प्रेक्षकांची दाद; पीव्हीआरमध्ये लातूरकरांकडून उत्स्फूर्त सत्कार, रितेश देशमुखनंतर लातूरचा आणखी एक अभिनेता झळकला प्रकाशझोतात







**लातूर/प्रतिनिधी :** मराठी चित्रपट घवडकुंडच्या यशानंतर लातूर जिल्ह्याचे सुपुत्र आणि उदयोन्मुख अभिनेते रॉकी देशमुख यांच्या दमदार अभिनयाची संपूर्ण महाराष्ट्रभर चर्चा रंगू लागली आहे. चित्रपटातील त्यांच्या प्रभावी भूमिका, सहज अभिनयशैली आणि दमदार स्क्रीन प्रेझेन्समुळे प्रेक्षकांसह चित्रपट रसिकांकडून त्यांचे भरभरून कौतुक होत आहे. घवडकुंडच्या यशामुळे केवळ चित्रपटालाच नव्हे, तर रॉकी देशमुख यांच्या अभिनय कारकिर्दीलाही नवी उंची मिळाली असून, लातूर जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यामुळे देऊळ बंद २ चे डायरेक्टर प्रवीण तरडे यांनीही रॉकी देशमुख यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात सर्वच जिल्ह्यात देशमुख यांचे कौतुक होत असून लातूरातील सर्वच चित्रपट ग्रहाला आज त्यांनी भेट देऊन मनसोक्त गप्पाही मारल्या आहेत.

चित्रपटाला राज्यभरातून मिळत असलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर लातूर शहरातील एमआयडीसी परिसरातील पीव्हीआर चित्रपटगृहात लातूरकरांच्या वतीने रॉकी देशमुख यांचा विशेष सत्कार करण्यात आला. पुष्पगुच्छ, शाल आणि सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित चाहत्यांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे अभिनंदन करत आगामी चित्रपटांसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.

लातूर जिल्ह्याने यापूर्वी मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता रितेश देशमुख यांच्या रूपाने राज्याला एक मोठा कलाकार दिला. आता त्याच परंपरेत रॉकी देशमुख यांनी आपल्या मेहनतीच्या, जिद्दीच्या आणि अभिनय कौशल्याच्या बळावर चित्रपटसृष्टीत वेगळी ओळख निर्माण करण्यास सुरुवात केली आहे. घवडकुंडमधील त्यांच्या भूमिकेने प्रेक्षकांच्या मनावर ठसा उमटवला असून, समीक्षकांकडूनही त्यांच्या अभिनयाचे कौतुक होत आहे.

चित्रपटातील त्यांच्या प्रभावी सादरीकरणामुळे सोशल मीडियावरही रॉकी देशमुख यांचे नाव चर्चेचा विषय ठरत आहे. विविध स्तरांतील मान्यवर, चित्रपटप्रेमी आणि चाहत्यांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, लातूरकरांमध्ये विशेष आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. रॉकी देशमुख यांचे हे यश केवळ वैयक्तिक नसून, लातूर जिल्ह्यातील नवोदित कलाकारांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. ग्रामीण भागातूनही मेहनत, चिकाटी आणि गुणवत्तेच्या जोरावर चित्रपटसृष्टीत यश मिळवता येते, याचे त्यांनी जिवंत उदाहरण घालून दिले आहे. त्यामुळे आगामी काळातही त्यांच्याकडून अधिक दर्जेदार भूमिका आणि उत्कृष्ट अभिनयाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

घवडकुंडच्या यशाने रॉकी देशमुख यांचे नाव राज्यभर झळकू लागले असून, लातूरच्या सांस्कृतिक आणि कलाक्षेत्राच्या इतिहासात आणखी एका नव्या पर्वाची नोंद झाली आहे.

## जानवळ येथील शेतकरी कुटुंबाला सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते शासकीय मदतीच्या धनादेशाचे वितरण



**लातूर/प्रतिनिधी :** चाकूर तालुक्यातील जानवळ येथे आगीच्या दुर्घटनेत जनावरे गमावलेल्या शेतकरी कुटुंबाला राज्य शासनाच्या वतीने आर्थिक मदत देण्यात आली आहे. राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते बाधित शेतकरी ज्ञानोबा भोजने यांच्या कुटुंबीयांना १ लाख १२ हजार रुपयांच्या आर्थिक मदतीचा धनादेश आज सुपूर्द करण्यात आला.

चाकूर तालुक्यातील जानवळ येथे गोठ्याला अचानक भीषण आग लागली होती. या दुर्दैवी घटनेत शेतकरी ज्ञानोबा भोजने यांची जनावरे होरपळून मृत पावली होती. घटनेची माहिती मिळताच सहकार मंत्री श्री. पाटील यांनी तातडीने भोजने यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांचे सांत्वन केले होते आणि शासनाकडून सर्वतोपरी मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते.

धनादेश वितरण प्रसंगी चाकूरचे तहसीलदार नरसिंग जाधव, जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, समाज कल्याण सभापती उत्तमराव माने आदी उपस्थित होते.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन



**पंढरपूर/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज श्री विठ्ठल आणि रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी आमदार दिलीप वळसे पाटील, नगराध्यक्ष प्रणिती भालके, मंदिर समितीचे सदस्य शकुंतला नडगिरे, ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, संभाजी शिंदे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी आदी उपस्थित होते.

तत्पूर्वी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन विकास आराखड्याअंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी करुन माहिती घेतली. यावेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी मंदिर जतन व संवर्धन विकास आराखड्याअंतर्गत करण्यात आलेल्या व करण्यात येणाऱ्या कामांची माहिती दिली.

## कृषी विज्ञान केंद्राकडून अल्पभुधारक शेतकऱ्यांना तुर आणि मुगाचे मोफत बियाणे वाटप

**रेणापूर/प्रतिनिधी :** जे.व्ही.एस.संस्था आणि परिवर्तन संस्थेच्या माध्यमातून कृषी विज्ञान केंद्र लातुर यांच्या वतीने शेतकरी मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.मेळाव्यास उपस्थित असलेल्या रेणापूर, चाकूर,अहमदपूर तालुक्यातील ९५ अल्पभुधारक शेतकऱ्यांना बी.डी.एन.गोदावरी तुरीचे आणि मुगाच्या बियाण्याचे मोफत वाटप करण्यात आले.

लातूर जिल्ह्यातील रेणापूर,चाकूर, अहमदपूर या तिन तालुक्यातील मागासवर्गीय अल्पभुधारक शेतकऱ्यांकरिता जे.व्ही.एस.संस्था आणि परिवर्तन संस्थेच्या माध्यमातून कृषी विज्ञान केंद्र लातुर येथे शेतकरी मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान केंद्र लातुरचे कृषी विस्तार विषय विशेषतज्ञ एस.बी बेद्रे हे होते तर मार्गदर्शक म्हणून कृषी विद्या विशेषतज्ञ




मथई पी.डी,कृषी तज्ञ डॉ.सोळुंके, जे.व्ही.एस.संस्थेचे प्रकल्प प्रमुख नागनाथ चव्हाण हे होते.

यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना कृषी विद्या विशेषतज्ञ मथई यांनी लागवड पद्धत,जमिनीचा पोत कसा राखला जाईल आणि अधिकाधिक उत्पन्न कसे घेता येईल तसेच रासायनिक शेती आणि शेंद्रीय शेती बाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

कृषी तज्ञ डॉ.सोळूंके यांनी सध्याची शेती परवडत नसल्याने अल्पभुधारक शेतकऱ्यांनी शेती बरोबरच जोडधंद्या चा फायदा घेण्याचे आवाहन केले.तर कृषी विज्ञान केंद्र लातुरचे कृषी विस्तार विषय विशेषतज्ञ बेद्रे एस.बी,यांनी जे.व्हि.एस. आणि परिवर्तन संस्थे सोबत गेल्या पाच वर्षापासून कृषी विज्ञान केंद्र जोडले असुन संस्थेच्या माध्यमातून शेकडो शेतकऱ्या पर्यंत पोहचता आले आहे यापुढेही संस्थेनी गरजवंत अल्पभुधारक शेतकऱ्यांची माहिती आमच्या पर्यंत पोहचवावी कृषी विज्ञान केंद्राकडूनही ज्यास्तीत जास्त शेतकऱ्यांना मदत आणि मार्गदर्शन करण्यात येईल असे उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना म्हटले आहे.तर जे.व्ही.एस.संस्थेचे प्रमुख नागनाथ चव्हाण यांनी मागासवर्गीय अल्पभुधारक शेतकरी आणि सध्याची शेतीची अवस्था अवस्था याबाबत माहिती देऊन कृषी विज्ञान केंद्राकडून दिल्या जाणाऱ्या सेवा याबाबत केंद्राचे आभार व्यक्त केले.

या मेळाव्यास उपस्थित असलेल्या रेणापूर, चाकूर, अहमदपूर तालुक्यातील ९५ अल्पभुधारक शेतकऱ्यांना बी.डी.एन.गोदावरी तुरीचे आणि मुगाच्या बियाण्याचे मोफत वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू आचार्य यांनी केले. यावेळी कृषी विज्ञान केंद्रातील अधिकारी कर्मचारी, जे.व्ही.एस, परिवर्तन संस्थेचे समन्वयक, कार्यकर्ते यांच्या सह रेणापूर, चाकूर, अहमदपूर तालुक्यातील अल्पभुधारक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.